impact
www.impactmeasurement.co.in

Pudhari

Page No: 12
Page Name: n.a.
Size: 234 sq. cm
AVE: INR 100,617

Type: Newspaper
Language: Marathi
Circulation: 184,846
Frequency: Daily

Pune - Sep 27, 2018

News monitored for: Force Motors

Title: Puneri Paltan name Girish Ernak as captain for PKL season 6



पुणेरी पलटणच्या नव्या जर्सीचे अनावरण करताना मुख्य प्रशिक्षक अशन कुमार, कर्णधार गिरिश एनार्क आणि मान्यवर.

# पुणेरी पलटणच्या कर्णधारपदी गिरीश एनार्कची निवड

## नव्या जर्सीचेही अनावरण

**पुणे : प्रतिनिधी**

प्रो-कबड्डी लीगच्या सहाव्या हंगामात पुणेरी पलटणच्या कर्णधारपदी गिरीश एनार्क याची निवड करण्यात आली आहे. या बरोबरच पुणेरी पलटणच्या नवीन जर्सीचेही अनावरण केले.

पुणेरी पलटणच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेला संघटनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश कांडपाल, मुख्य प्रशिक्षक अशन कुमार, प्रवीण कर्नावत आणि अनुराग व्होरा उपस्थित होते. पुणेरी पलटणचा पहिला सामना ७ ऑक्टोबरला चेन्नई विरुद्ध होणार आहे, तर पुण्यात १८ ते २४ ऑक्टोबरपर्यंत सामने होतील. या प्रसंगी बोलताना कांडपाल म्हणाले, प्रो-कबड्डी लीगच्या या हंगामात गिरीश एनार्क संघाचा कर्णधार, तर अशन कुमार मुख्य प्रशिक्षक म्हणून भूमिका पार पाडतील. मागील हंगामातील झालेल्या चुका या वेळी सुधारून चांगली कामगिरी करू, असा मला विश्वास आहे.

नवनियुक्त कर्णधार गिरीश एनार्क म्हणाला, कर्णधारपद ही मोठी जबाबदारी माझ्यावर आहे. एकसंघम्हणून आमचा संघ बलवान आहे. यंदा तीन महिने हंगाम सुरू राहणार असल्याने तंदुरुस्त राहणे गरजेचे आहे. या वेळी आम्ही नक्की वेगळे करून दाखवू. त्याचबरोबर मागील चुका सुधारण्याचा प्रयत्न सुरू आहे. मुख्य प्रशिक्षक अशन कुमार म्हणाले, गिरीश हा अनुभवी खेळाडू आहे. तसेच तो पुण्याचादेखील आहे. आम्ही गोव्यात फिजिकल फिटनेस कॅम्प घेतला होता. आमच्याकडे अनुभव आणि नवीन खेळाडूंचे मिश्रण चांगले आहे. आमचे सर्व खेळाडू मेंटली आणि फिजिकली फिट आहेत.



© Pudhari